**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

क्र. : मुमाआ-२०२४/नों. क्र.२५१/त.क्र.१०२/२४/०१

प्रति,
श्री.रियाज बाबू अबास अंसारी,
रुम नं.१, साकीनबी अब्दुल गफूर चाळ,
पारसीवाडी, घाटकोपर (प.), मुंबई-४०० ०८६.

जन माहिती अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका अनुज्ञापन मुख्यालय कार्यालय,
दादर उदंचन केंद्र, सेनापती बापट मार्ग, दादर (प.), मुंबई-४०० ०२८.

| | | |
|---|---|---|
| तक्रारीचा दिनांक | : | १७-०१-२०२४ |
| सुनावणीचा दिनांक | : | ०४-०४-२०२४ |
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

तक्रारदार यांनी दि.१७-०१-२०२४ रोजी आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीमध्ये माहिती अर्ज दि.१०-१२-२०२३ व २६-१२-२०२३ वर जन माहिती अधिकारींनी काही कार्यवाही केली नाही असे नमूद केले आहे. तक्रारीसोबत माहिती अर्ज जोडले आहेत. दि.१०-१२-२०२३ चा माहिती अर्ज श्रीम.अश्विनी भिडे, पूर्व उपनगरे व दि.२६-१२-२०२३ चा माहिती अर्ज श्री.प्रकाश जाधव लायसेन्स सुपरिटेंडेंट यांना दिला होता.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारदार अनुपस्थित. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अनुज्ञान अधीक्षक श्री.अनिल शेवाळे उपस्थित.

आजच्या सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अनुज्ञान अधीक्षक श्री.अनिल शेवाळे यांनी सूचित केले की, तक्रादारांचा माहिती अर्ज अप्राप्त आहे. श्री.प्रकाश जाधव लायसेन्स सुपरिटेंडेंट हे दि.३१-१२-२०२३ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अनुज्ञान अधीक्षक श्री.अनिल शेवाळे यांनी सूचित केले की, तक्रारदारांचा दि.१०-१२-२०२३ चा दुसरा माहिती अर्ज श्रीम.अश्विनी भिडे यांचे कार्यालयाचे अधीक्षकांनी दि.२७-१२-२०२३ रोजी उप आयुक्त परिमंडळ-६ यांचेकडे वर्ग केल्याची प्रत आयोगात सादर

केली. जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (परिमंडळ-६) यांचे प्रशासकीय अधिकारी श्री.रमेश मडके यांनी सदर माहिती अर्ज दि.०४-०१-२०२४ रोजी सहाय्यक आयुक्त. एन विभाग यांचेकडे वर्ग केला.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि-१) एन विभाग श्री.सचिन बेलदार यांनी दिनांक १६-०२-२०२४ रोजी माहिती अर्जाचे उत्तर दिले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अनुज्ञान अधीक्षक श्री.अनिल शेवाळे यांनी सर्व अभिलेख आयोगास सादर केले आहेत.

अभिलेखावरुन स्पष्ट होते की, तक्रारदारांना सर्व माहिती दिलेली आहे.

सबब, आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**आदेश**

अर्जदाराचा तक्रार अर्ज अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक : ०४-०४-२०२४

( समीर सहाय )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

State Information Commission
Maharashtra